# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 11 August 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ११ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- सुपीक, हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांचं आज पंतप्रधानांच्या हस्ते वाटप
- ऊसाव्यतिरिक्त मका, तांदूळ, फळं आणि बांबू यांच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती करण्यासाठी बहुआयामी आणि भविष्यवादी दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज, केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याकडून व्यक्त
- जालना - जळगाव रेल्वेमार्ग पुढच्या चार ते पाच वर्षांत पूर्ण होईल- रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती
- राजकीय स्वार्थासाठी राज्यात जातीय द्वेष-राज ठाकरे यांच्याकडून खंत व्यक्त
- प्रसिद्ध अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजाराने निधन

  आणि
- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप, स्पर्धेत भारताने जिंकली एकूण सहा पदकं

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत अत्यंत सुपीक, हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ करणार आहेत. यावेळी ते शेतकरी आणि वैज्ञानिकांशी संवाद साधतील. यात ३४ नगदी पिकं आणि

२७ बागायती पिकं आहेत. यात भरडधान्य, तेलबिया, कडधान्य, ऊस, कपाशी, तृणधान्य यांसह भाज्या, फळं, कंदमुळं, मसाले, औषधी वनस्पती, फुलं अशा विविध पिकांचा समावेश आहे.

****

देशात ऊस पिकाव्यतिरिक्त मका, तांदूळ, फळं आणि बांबू यांच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती करण्यासाठी बहुआयामी आणि भविष्यवादी दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली आहे. ते काल नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या कार्यक्रमात बोलत होते. येत्या काही वर्षांत वर्षाकाठी एक हजार कोटी लीटर इतकी इथेनॉलची गरज भासणार असून, भविष्यात इथेनॉल इंधनाच्या निर्यातीच्या दृष्टिकोनातून उत्पादन वाढवण्याची तयारी केली पाहिजे, असं ते म्हणाले. २०३० पर्यंत २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल तयार करण्याचं उद्दिष्ट असल्याचं शाह यांनी सांगितलं.

****

जालना – जळगाव रेल्वेमार्ग पुढच्या चार ते पाच वर्षांत पूर्ण होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं आहे. ते काल या प्रकल्पाबाबत माहिती देत होते. या प्रकल्पामुळे ६० लाख मनुष्य दिवस रोजगार निर्माण होणं अपेक्षित असून, कार्बन उत्सर्जन ५४ कोटी किलो कमी होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या मार्गासाठी सुमारे ९३५ हेक्टर भूसंपादन केलं जाणार असून, साडे २३ किलोमीटर अंतराचा देशातला सर्वाधिक लांबीचा बोगदा साकारला जाणार असल्याचं, वैष्णव यांनी सांगितलं.

****

नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजुरी दिली आहे. सात हजार १५ कोटी रुपयांच्या या योजनेतून, पश्चिमी वाहिनी नार-पार-गिरणा या नदीखोऱ्यातून, १० पूर्णांक ६४ शतांश टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे. या योजनेमध्ये नऊ धरणं प्रस्तावित आहेत. त्यातून २६० पूर्णांक ३० दशलक्ष घन मीटर पाणी उपसा करुन, चणकापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात

सोडण्यात येणार आहे. यामुळे नाशिक जिल्ह्यातल्या सुरगाणा, कळवण, देवळा, मालेगाव आणि जळगाव जिल्ह्यातल्या चाळीसगाव, पारोळा, भडगाव तालुक्यांतल्या एकूण ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार आहे.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज केलेल्या महिलांना येत्या १७ तारखेला ओवाळणी म्हणून दोन महिन्यांचं अनुदान खात्यात जमा केलं जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल धुळ्यात झालेल्या सभेत बोलत होते. या योजनेअंतर्गत एकही पात्र बहीण वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

****

राजकीय स्वार्थासाठी राज्यात जातीय द्वेष पसरवला जात असल्याची खंत, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं नवनिर्माण यात्रेच्या समारोपानंतर पत्रकार परिषदेत बोलत होते. उपलब्ध संधीचा योग्य वापर केल्यास राज्यात आरक्षणाची गरज नाही असं सांगत आर्थिक निकषांवर आरक्षण देण्याच्या मागणीचा ठाकरे यांनी यावेळी पुनरुच्चार केला. ते म्हणाले...

***महाराष्ट्र राज्यासारखं राज्य मला अस वाटतं हिंदुस्थानात दुसरं कुठलं राज्य नाही आहे. या राज्यामध्ये शिक्षणापासून ते नौकऱ्यापर्यंत, उद्योग – धंद्यांपर्यंत इतक्या गोष्टी इथे उपलब्ध असतांना बाहेरच्या राज्यांमधल्या लोकांना इथे सगळ्या गोष्टी मिळतात. पण आमच्या मुलींना मुलांना इथे मिळत नाहीत त्या ज्या महाराष्ट्रामधल्या जो कोटा आहे महाराष्ट्रातील ज्या काही गोष्टी उपलब्ध आहेत या जर समजा आपण नीट वापल्या महाराष्ट्रातील मुलामुलीसाठी, मराठी मुलामुलींसाठी तर आपल्याला खरं तर आरक्षणांची गरज नाही.***

****

छत्रपती संभाजीनगर शहरानजिक नक्षत्रवाडी इथल्या प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत गृह प्रकल्पाचं, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते काल भूमिपूजन झालं. या प्रकल्पाचं बांधकाम अत्याधुनिक तंत्रज्ञानाने करण्यात येणार असल्याने, संपूर्ण प्रकल्प दीड ते दोन वर्षात पूर्ण होईल, असा विश्वास, सावे यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पाअंतर्गत सुमारे साडे सहा हेक्टर क्षेत्रावर एक हजार छपन्न सदनिका बांधण्यात येणार आहेत.

दरम्यान, जिल्ह्यात सांडपाणी व्यवस्थापनासाठी दोनशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार संजय शिरसाट यांनी यावेळी दिली.

****

या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत...

****

मराठी सिनेसृष्टीतले प्रसिद्ध अभिनेते विजय कदम यांचं काल मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं, ते ६७ वर्षांचे होते. गेल्या दीड वर्षांपासून ते कर्करोगाने त्रस्त होते. विजय कदम यांनी मराठी नाटकं, चित्रपट तसंच दूरदर्शन मालिका अशा तीनही माध्यमांमधून अनेक वर्ष काम केलं. त्यांनी भूमिका साकारलेलं 'विच्छा माझी पुरी करा' हे लोकनाट्य, तसंच 'चष्मेबहाद्दर', 'पोलिसलाईन', 'हळद रुसली कुंकू हसलं' 'आम्ही दोघ राजा राणी' आदी चित्रपटही खूप गाजले. कदम यांच्या पार्थिव देहावर काल अंधेरीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीपटू रितिका हुड्डा हिला उपांत्यपूर्व फेरीत किरगिझस्तानच्या कुस्तीपटूकडून पराभव पत्करावा लागला. गोल्फ मध्ये अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांचंही आव्हान काल संपुष्टात आलं. या स्पर्धेत भारतीय खेळाडुंचे सामने संपले असून, भारताने एक रौप्य आणि पाच कांस्य, अशी एकूण सहा पदकं जिंकली आहेत. ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप होत आहे. भारतीय वेळेनुसार मध्यरात्री साडे बारा वाजता समारोप सोहळ्याला सुरुवात होईल.

दरम्यान, या स्पर्धेत भारतीय कुसतीपटू विनेश फोगाटला अपात्र केल्याप्रकरणी दाखल याचिकेवर आंतरराष्ट्रीय क्रिडा न्यायालय येत्या मंगळवारी १३ तारखेला निकाल सुनावणार आहे. या याचिकेत विनेशनं संयुक्त रौप्य पदकाची मागणी केली आहे.

****

राज्य सरकारची लाडकी बहीण योजना फसवी असल्याची टीका, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातल्या काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा काल लातूर इथं पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्निथला, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, आमदार अमित देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी मराठवाड्यातल्या काँग्रेसच्या नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार करण्यात आला.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मुखेड तालुक्यात काल राज्यस्तरीय मातंग समाज मेळावा घेण्यात आला. अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था –आर्टी ची स्थापना केल्याबद्दल मातंग समाजाच्यावतीनं शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. आरक्षण प्रश्नी लवकरच तोडगा निघेल, मातंग समाजाच्या सर्व प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचं देसाई यांनी यावेळी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्याच्या परांडा तालुक्यात मौजे बावची इथं पालकमंत्री तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत हर घर तिरंगा उपक्रमाचा काल शुभारंभ करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थी आणि उमेद महिला स्वयंसहायता गटातल्या महिलांनी तिरंगा रॅली काढली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनी सामूहिक तिरंगा प्रतिज्ञा घेतली. तसंच, गावातल्या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

****

लातूर जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियानांतर्गत काल विविध शाळांमध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आली. जिल्हा परिषद शाळांसह विविध शाळांमधले विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले.

****

परभणी इथं काल महसूल पंधरवाड्यामध्ये 'सैनिक हो तुमच्यासाठी' हा कार्यक्रम जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी हुतात्मा सैनिकांच्या वीर पत्नी आणि वीर माता-पिता यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

****

परभणी इथं काल मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण अंतर्गत जिल्हा परिषदेत विविध पदाकरता विशेष शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्ह्यातले जवळपास ३०० युवक या शिबिरात सहभागी झाले होते.

****

नांदेड जिल्ह्यात प्रशासनातर्फे आज विशेष मतदार नोंदणी अभियान राबवलं जाणार आहे. पुढच्या आठवड्यातही १७ आणि १८ तारखेला हे अभियान पुन्हा राबवण्यात येणार असल्याचं प्रशासनातर्फे कळवण्यात आलं आहे.

****